दैनिक
# समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -२६५ गुरूवार,दि.२९ मे २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-265 Thursday, Dt.29 May 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# आज परभणीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऋण व्यक्त सोहळा ऐतिहासिक होणार !

## पालकमंत्री सौ. मेघना साकोरे- बोर्डीकर यांची स्वप्नपूर्ती प्रत्यक्षात साकारणार !!

परभणी / प्रवीण चौधरी

परभणीकरांच्या वतीने मुख्यमंत्र्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी शहरातील स्टेडिअम मैदानावर आज गुरुवार २९ मे रोजी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऋण व्यक्त सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा ऋण व्यक्त सोहळा ऐतिहासिक होणार असून पाहिलेली स्वप्नपूर्ती प्रत्यक्षात साकारणार असल्याने या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी परभणी जिल्ह्यातून लाखोच्या संख्येने उत्स्फूर्तपणे उपस्थित रहावे असे आवाहन पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले आहे.

पालकमंत्री बोर्डीकर यांच्या जिंतूर रस्त्यावरील संपर्क कार्यालयात आज मंगळवार २७ मे रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, सुरेश भुमरे, मंगल मुदगलकर, राजेश देशमुख, प्रशांत सांगळे, बाळासाहेब जाधव आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना पालकमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीस



मेडीकल कॉलेजच्या इमारत बांधकामाचे भूमीपूजन ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. तसेच कृषि विद्यापीठात आयोजित केलेल्या संयुक्त कृषी संशोधन विकास समितीच्या बैठकीचे उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्याहस्ते होणार आहे. हा कार्यक्रम झाल्यानंतर येथील स्टेडिअम मैदानावर परभणीकरांच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. जिल्ह्याला राज्यमंत्री व पालकमंत्री देऊन जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देवाभाऊ यांनी केले असून या सत्काराच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांचे ऋण व्यक्त केले जाणार आहे. या ऋण व्यक्त सभेतून परभणी जिल्ह्यातील विकास कामांची मागणी केली जाणार आहे. यावेळी मिशन सिंदूर निमित्त सैनिकांचा जयघोष केला जाणार आहे. या सोहळ्यास राज्याचे इतर मंत्रीही उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती पालकमंत्री बोर्डीकर यांनी दिली. येणार्या काळात जिल्ह्याच्या विकासाची गती निश्चितपणे वाढेल, असा विश्वासही पालकमंत्री बोर्डीकर यांनी यावेळी व्यक्त केला.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन होणाऱ्या संयुक्त कृषी संशोधन विकास समितीची तीन दिवशीय बैठक

### तीन दिवशीय बैठकीत तीनशे ते चारशे कृषि शास्त्रज्ञांचा सहभाग, ३६ नवीन वाणासह साधारणतः २४७ तंत्रज्ञान शिफारसी मांडल्या जाणार

परभणी /राजयोग प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीची ५३ वी तीन दिवशीय बैठक २९ ते ३१ मे दरम्यान होणार असून त्याचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते होणार आहे. या तीन दिवशी बैठकीत ३०० ते ४०० कृषि शास्त्रज्ञ सहभागी होणार असून ३६ नवीन वाहनांसह सर्वसाधारणपणे ४४७ तंत्रज्ञान शिफरशी या बैठकीद्वारे मांडल्या जाणार आहेत, अशी माहिती कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी दिली.



वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात महाराष्ट्र कृषि शिक्षण संशोधन परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने राज्यातील चारही कृषि विद्यापीठाची ही ५३ व्या संयुक्त कृषि संशोधन विकास समिती-२०२५ चे आयोजन २९ ते ३१ मे दरम्यान करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन २९ मे रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि मंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती अॅड. माणिकरावजी कोकाटे राहणार असून कुलगुरू मा. प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे

(उर्वरीत पान २ वर)



# अंबाजोगाईत महावितरणच्या गलथान कारभारामुळे जनजीवन विस्कळीत

## हतबल कर्मचारी फिल्डवर परंतु कार्यकारी अभियंता बिझी नाहीतर स्विच ऑफ

अंबाजोगाई/सुनिल सिरसाट

या पंधरवड्यामध्ये आंबेजोगाई महावितरणच्या गलथान कारभाराने आंबेजोगाई शहर व भोवतालच्या शहरालगतच्या परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाला असून केवळ उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या ढसाळ नियोजनामुळे आंबेजोगाईच्या कानाकोपऱ्यातील नागरिक पुरता वैतागून गेला आहे.

अंबाजोगाईचे कार्यालय असून अडचण नसून खोळंबा असे वाटत आहे. कारण लाईट ऑफिसला जेंव्हा-केंव्हा फोन केला जातो तेंव्हा-तेंव्हा झाड मोडून पडले आहे, फांद्या तोडायला सुरू आहेत, तार तुटली आहे आणि तारेला आडी पडली आहे असे विविध तेच ते कारणं वारंवार सांगून तब्बल दोन आठवड्यापासून रोज कमीत कमी आठ (८) तास आणि जास्तीत जास्त १६-१७ तास वीज पुरवठा खंडित असल्याने एक नाही तर अनेक समस्यांनी सर्वसामान्य नागरिक, व्यापारी आणि छोटे व्यावसायिक चांगलेच ग्रासले गेले असून याचे उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांना मात्र काहीच देणेघेणे नाही असेच त्यांच्या एकूण प्रतिसादावरून दिसून येत आहे. अधूनमधून उपअभियंता यांचा तरी फोन लागतो आणि ते केंव्हातरी उचलतात. परंतु पंधरा दिवसात कार्यकारी अभियंता यांचा फोन एक वेळाही लागला नसून त्यांना प्रसार माध्यमातून किंवा सोशल मीडियातून कितीही जागे करण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना काडीमात्र फरक पडत नसून आता याकडे शहराचे लोकप्रतिनिधी आणि मतदारसंघाच्या कर्तव्यदक्ष आमदार यांनीच लक्ष घालण्याची वेळ आली असल्याची चर्चा चौका-चौकात सुरू आहे.

कनिष्ठ अभियंता सतिश जाधव आणि कर्मचारी २४ तास उपलब्ध ; परंतु वरिष्ठांच्या ढसाळ नियोजनामुळे नागरिकांच्या तोफेला हीच मंडळी*

यावेळी पावसाळा सुरू होण्याअगोदरच मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू झाल्याने पुढील खरा अध्याय तर अजून बाकीच आहे. तेंव्हा लोकप्रतिनिधी वरिष्ठ अधिकाऱ्यांची कान उघडणी करून या समस्येवर तात्काळ काही कायमस्वरूपी पर्याय व्यवस्था काढून वैतागलेले आंबेजोगाईकरांना या सहन न होणा-या त्रासातून मुक्त करणार ....? की जाणीव हरपलेले कार्यकारी अभियंता आणि उपाभियंता लोकप्रतिनिधींनाही मोजणार नाहीत.....?? हाच प्रश्न आता सर्वांना पडला असून पुढील चार दिवसात महावितरणचे बीड-लातुर-संभाजीनगर स्तरावरील वरिष्ठ अधिकारी आणि शहर-तालुका लोकप्रतिनिधी अगदी मनावर घेऊन हा गलथान कारभार थांबतील का.....??? हे पाहणे आता औस्तुक्याचे आहे.....!

# अधिकारी व पदाधिकारी प्रामाणिक असतील तर सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल - प्रा ईश्वर मुंडे

## पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी @ धारूर




तालुक्यातील आसरडोह येथे मागील पंचवीस वर्षापासून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली जाते.या वर्षी दि.२६ मे २०२५ सोमवार रोजी आसरडोह येथील जयंतीचा रौप्य महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्या देवींच्या त्रिशताब्धी जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पदावरून बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की, लोकशाहीमध्ये जनतेने प्रमाणिक उमेदवाराला आपले बहुमूल्य मतदान देवून विजयी करणे हेच देश कार्य आहे. अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर राष्ट्र माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अपेक्षित सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल.सद्य स्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा प्रशासकीय कार्याचा वारसा प्रभावीपणे चालवणाऱ्या अधिकाऱ्याला प्रती वर्षी आपल्या समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार देण्यात यावा.या मुळे अधिकारी-कर्मचारी यांचे मनोबल वाढून त्यांच्या हातून जन हिताची कामे अधिक होतील.अशी संकल्पना मांडली.या संकल्पनेला उपस्थितांनी टाळयाच्या कडकडाटात प्रतिसाद दिला व सन २०२५ चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ऊत्कृष प्रशासक पुरस्कार धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री देवीदास वाघमोडे यांना सर्वानुमते जाहीर करण्यात आला. लवकरच त्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.कार्यक्रमास जेष्ठ नेते माऊली तात्या गडदे,सरपंच रविकिरण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व नवीन नौकरी लागलेल्या कर्मचाऱ्यांचा -हदय सत्कार करण्यात आले. आसरडोह येथील जन्मोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसिद्ध वक्ते महेश पिंगळे,ॲड.दत्तात्रय काजगुंडे,माऊली तात्या गडदे, गोविंद शिंदे,महेश बिट्टे,संदीप काजगुंडे,रंजित राठोड, गणेश पिंगळे, विष्णू शिंदे, संतोष काजगुंडे, आकाश शिंदे, उत्तम तरकसे, अंगद पिंगळे, विनायक गडदे, यशवंत धायगुडे, रमेश काजगुंडे, अनंत खडके, पांडुरंग काजगुंडे, बाबुराव देवकते,संतोष झारगड, प्रकाश काजगुंडे यांनी प्रयत्न केले.




## प्रा.अनिता कसबे यांना विभागीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ हिंदी शिक्षक महासंघाच्या वतीने सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रा.अनिता कसबे यांना विभागीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नाशिक विभागाचे पदवीधर आमदार सत्यजित तांबे, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब घाडगे पाटील, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.मिलिंद कांबळे, प्रदेश सचिव रेवंत कर्दळे, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.राजकुमार कांबळे, राज्य कोषाध्यक्ष सुंदर लोधे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा कार्यक्रम नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे संपन्न झाला. या कार्यक्रम हिंदी शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेत राज्यातील दोनशे शिक्षक सहभागी झाले होते.

# संपादकीय

## व्यवस्था गेली वाहून

यंदा मे महिन्यात जून-जुलै महिन्यात पडावा तसा पाऊस होत असून, या पावसाने उडालेली दाणादाण पाहता सारी व्यवस्थाच वाहून गेल्याची स्थिती आहे. सर्वसाधारण आगमनाच्या १६ दिवस आधी राज्याच्या बहुतेक भागांमध्ये संततधार सुरू झाली आहे.

हवामानात टोकाचे बदल होत असल्याचे इशारे शास्त्रज्ञ देत असले, तरी त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आपल्याकडील नागरी यंत्रणांना यंदा लवकर दाखल झालेल्या पावसाने खडबडून जागे केले आहे. यंदा मे महिन्यात जून-जुलै महिन्यात पडावा तसा पाऊस होत असून, या पावसाने उडालेली दाणादाण पाहता सारी व्यवस्थाच वाहून गेल्याची स्थिती आहे. सर्वसाधारण आगमनाच्या १६ दिवस आधी राज्याच्या बहुतेक भागांमध्ये संततधार सुरू झाली आहे.

केरळमध्ये दाखल झाल्यानंतर आठवडाभराने राज्यात हजेरी लावणाऱ्या मान्सूनचा यंदाचा केरळपासूनचा पुढचा प्रवास प्रचंड वेगाने झाला आणि मुंबई, पुणे यांसह राज्याचा बराचसा भाग त्याने व्यापला. मुसळधार पावसाच्या प्रदेशांसह कमी पावसाच्या जिल्ह्यांमध्येही यंदा अतिवृष्टीसदृश पाऊस झाल्याने पावसाचा 'पॅटर्न' बदलतो आहे काय, हा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. आता काहीशी उघडीप मिळाल्यावर पेरण्या होऊ शकतील; मात्र अचानक आलेल्या पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे आणि फळबागायतीचे मोठे नुकसान झाले आहे.

मोठा पाऊस झाला, की रस्तोरस्ती तुंबलेले पाणी, खड्डे, विस्कळित वीजपुरवठा आणि वाहतुकीची कोंडी हे चित्र आता सार्वत्रिक झाले आहे. त्याला ना महानगरे अपवाद आहेत, ना टुमदार शहरे. यंदाही हेच होत आहे. जागोजागी पाण्याची तळी साचली, तासनतास वाहतुकीच्या कोंडीत नागरिकांना अडकून पडावे लागले. ठिकठिकाणी झाडे कोसळली. राज्यातील बहुतांश यंत्रणांना आपली अव्यवस्था झाकण्यासाठी, यंदा पाऊस नेहमीपेक्षा लवकर आला, अशी सबब मिळाली असली, तरी पाऊस नेहमीच्या वेळी आला असता, तरी या स्थितीत फरक पडला नसता. पावसाच्या पहिल्या तडाख्यातच या यंत्रणांच्या कामांचे पितळ उघडे पडले.

अब्जावधी रुपयांचे नवनवे प्रकल्प राबविण्याच्या आजच्या काळात पावसाळ्यापूर्वी धोकादायक झाडे व त्यांच्या फांद्याची छाटणी, नालेसफाई, रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती अशा दैनंदिन कामांकडे मात्र यंत्रणांचे दुर्लक्ष होताना दिसते. नालेसफाईच्या कोट्यवधी रुपयांच्या निविदा काढल्या जातात, कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाच्या वापराच्या घोषणा होतात; पण प्रत्यक्षात पहिले पाढे पंचावन्न, अशी स्थिती असते. आपापल्या शहरांमध्ये पाऊस पडल्यावर पाणी साचत असलेली ठिकाणे लहान मुलांनाही तोंडपाठ झाली आहेत; पण अब्जावधींचा अर्थसंकल्प, नवीन तंत्रज्ञान, अनुभवी अधिकारी आणि अभियांत्रिकी विषयातील तज्ज्ञांची फौज असतानाही स्थानिक किंवा राज्यपातळीवरील यंत्रणांना त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे का शक्य होत नाही, हे कोडे सामान्यजनांना अद्याप उलगडलेले नाही.

नियोजनाच्या अभावामुळे गेल्या काही दशकांमध्ये राज्यातील शहरे अस्ताव्यस्त वाढली आहेत. या वाढत्या लोकसंख्येला पुरतील, अशा अन्य सुविधांप्रमाणेच पावसाचे पाणी वाहून नेणारी पुरेशी व्यवस्था उभी न राहणे, हे यामागील सर्वांत मोठे कारण. त्यातच गेल्या काही काळात कमी वेळात प्रचंड प्रमाणात पाऊस होतो, असे अनुभवास आले आहे. मग अपुऱ्या वाहिन्यांची क्षमता कमी पडते आणि रस्त्यांवर कमरेपर्यंत पाणी साचते. दुसरी बाब म्हणजे, जागा मिळेल, तेथे काँक्रिट ओतण्याचा लोकप्रतिनिधी-नोकरशाहीचा अट्टहास या शहरांच्या मुळावर येत आहे. हमरस्त्यांसह शहरांमधील गल्लीबोळांतील रस्तेही काँक्रिटचे करण्यामागे काय 'अर्थ' आहे, याची झाडाझडती एकदा वरिष्ठांनी घेतली पाहिजे.

पान १ वरून...

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन ....

स्वागताध्यक्ष आहेत. कार्यक्रमास पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, उर्जा, महिला व बालकल्याण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्हा पालकमंत्री श्रीमती मेघनाताई साकोरे-बोर्डीकर, कृषि, वित्त, नियोजन, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषि परीषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार यांची प्रमुख उपस्थिती आहे. यावेळी राज्यसभा सदस्य खा. श्रीमती फौजिया खान, लोकसभा सदस्य खा. संजय जाधव, विधान परिषद सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आ. सतीश चव्हाण, विधान परिषद सदस्य आ. विक्रम काळे, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आ. डॉ. राहुल पाटील, विधानसभा सदस्य आ. रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आ. रमेशराव कराड, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आ. अभिमन्यू पवार आणि विधानसभा सदस्य आ.राजेश विटेकर, विद्यापीठ कार्यकारी परिषद सन्मानीय सदस्य विठ्ठल सकपाळ, सुरज जगताप, प्रविण देशमुख, दिलीप देशमुख, डॉ. आदिती सारडा, भागवत देवसरकर, डॉ. कौशिक बॅनर्जी, डॉ. व्ही. एम. मायंदे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव (कृषि) विकासचंद्र रस्तोगी (भाप्रसे), पुणे येथील कृषि परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे (भाप्रसे), कृषि आयुक्त सुरज मांढरे (भाप्रसे), पिडीकेव्ही अकोला आणि एमपीकेव्ही राहुरीचे कुलगुरू मा. डॉ शरद गडाख, बीएसकेकेव्ही दापोलीचे कुलगुरू मा. डॉ, संजय भावे हे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आहेत.

कृषि परिषदेचे सर्व संचालक, चारही कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक, शिक्षण संचालक, विस्तार शिक्षण संचालक यांच्यासह जवळपास तीनशे ते चारशे शास्त्रज्ञ उपस्थित रहाणार आहेत. यावेळी विद्यापीठ तंत्रज्ञान व उपक्रमावर आधारित प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांनी केलेले संशोधन शेतकरी बांधवापर्यंत पोहोचविण्यासाठी महत्वाचा टप्पा मानल्या जाणार्या बैठकीचे आयोजन दरवर्षी एका कृषी विद्यापीठात करण्यात येते. यावर्षी परभणी कृषी विद्यापीठास बैठक आयोजित करण्याचा मान प्राप्त झाला.या बैठकीत नैसर्गिक शेतीस चालना देण्यासाठी पीएम प्रणाम योजनेवर विचार मंथन करण्यात येणार आहे तसेच हवामान अनुकूल तंत्रज्ञान, पिकांच्या बाजारभाव आणि मागणीनुसार अंदाज बाधण्यासाठी राज्यापातळीवर सर्वांच्या सहभागातुन विकास यंत्रणा निर्माण करण्यासाठी तसेच शेतकर्यांच्या सक्षमी करणासाठी आधुनिक प्रयोग शेतकर्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्वाचा असलेला शेतकर्यांचा डिजिटल मित्र : 'महाविस्तार एआय' ॲपचा प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने सदरिल बैठकित विचार मंथन करण्यात येणार असल्याची माहिती माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी दिली.सदर बैठक ही तीन दिवसांकरिता आयोजित करण्यात येत असुन पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभ लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येतो. त्यानंतर तीन तांत्रिक सत्रांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये पहिल्या तांत्रिक सत्रात कृषि संलग्न विभागाच्या संचालकांमार्फत आणि राष्ट्रीय संशोधन केंद्राच्या वतीने सादरीकरण केले जाते. दुसर्या दिवशी आयोजित केलेल्या दुसर्या तांत्रिक सत्रात १२ गट तयार करुन विद्यापीठामार्फत संशोधीत केलेले विविध पिकांचे संकरित व सुधारित वाण, यंत्र व अवजारे आणि तंत्रज्ञान शिफारशी सादर केल्या जातात. यावर सखोल चर्चा होवुन अशा शिफारशींना समितीमार्फत मान्यता दिली जाते. तिसर्या दिवशीच्या समारोपीय तांत्रिक सत्रात दोन दिवसात झालेले सर्व सादरीकरण आणि निर्णय तसेच समितीने दिलेल्या सर्वसाधारण सुचना या संदर्भात सादरीकरण केले जाते आणि सर्व कार्यवृतांतास मान्यता दिली जाते आणि या बैठकीचा समारोप करण्यात येतो. चारही विद्यापीठांचे विविध पिकांचे संकरित व सुधारित वाण, यंत्र व अवजारे आणि तंत्रज्ञान शिफारशी मान्यतेनंतर महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागास सादर करुन विस्तार यंत्रणेमार्फत शेतकयांच्या शेतावर प्रत्यक्ष राबविण्यात येतात.या बैठकीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांमार्फत संशोधनावर आधारीत एकुण ५८ शिफारशी बैठकीत सादर करण्यात येणार असुन यात चार (४) प्रसारीत वाण, एक (१) कृषि औजारे यासह इतर ५३ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारणासाठी मांडण्यात येणार आहेत. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठामार्फत संशोधनावर आधारित एकुण १०३ शिफारशी सादर करण्यात येणार असून यात १० प्रसारित वाण, १२ कृषि अवजारांसह इतर ८१ तंत्रज्ञान शिफारशी प्रसारणासाठी मांडण्यात येणार आहेत. तसेच राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठामार्फत संशोधनावर आधारित एकुण ९४ शिफारशी सादर करण्यात येणार असून यात ९ प्रसारित वाण, ११ पूर्वप्रसारीत वाण, ३ कृषि अवजारे, १ जैविक ताण सहन करणारे स्त्रोतसह इतर ७० तंत्रज्ञान शिफारशी प्रसारणासाठी मांडण्यात येणार आहेत. तर दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामार्फत संशोधनावर आधारित एकुण ५० शिफारशी सादर करण्यात येणार असून यात २ प्रसारित वाण, ५ कृषि अवजारांसह ४३ सुधारीत तंत्रज्ञान शिफारशी प्रसारणासाठी मांडण्यात येणार आहेत.

# आंबेडकर चळवळीस समर्पित दिपक कदम




प्रतिनिधी @ नांदेड

अधिकारी पदाचा राजीनामा देवून, अविवाहित राहून, वडिलोपार्जित शेती, घर व सर्व संपत्ती आंबेडकरवादी चळवळीस समर्पित करून हजारो,लाखो गरीब,वंचित, बहुजन व सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना आय.ए.एस,आय.पि.एस व ईतर क्षेत्रातील अधिकारी घडवणारे आंबेडकरवादी चळवळीतील निस्सिम त्याग व समर्पण, विद्यार्थी व तरूणांचे आदर्शस्थान असणारे शिक्षणक्रांती, १८ तास अभ्यास उपक्रम,प्रशासक बना असे सांगणारे आंबेडकरवादी मिशन चळवळीचे प्रणेते व प्रमुख मा. आयु.दिपक कदम सर यांना त्यांच्या दि.२५ मे २०२५ रोजीच्या वाढदिवसाच्या मंगलमय,निरोगीदायी, दिर्घायुष्य व असेच अधिकारी घडवण्याचे कार्य देश पातळीवर जावे अशा शुभेच्छा देताना पत्रकार ॲड. गौरव उध्दवराव सरोदे, भिम आर्मी पार्टीचे नांदेड उत्तरचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष प्रभाकरराव वाघमारे व ईतर मान्यवर उपस्थित होते.








पुणे - वीरशैव माहेश्वर मंडळ पुणे जिल्हा व ॐ माहेश्वर वैदिक सेवा संस्था पुणे आयोजित शिवदिक्षा विधी कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न.


महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री
मा.ना.श्री देवेंद्रजी फडवणीस साहेब
आपले प्रभावती नगरी मध्ये
हार्दिक स्वागत..
स्वागतोच्छुक
संतोष त्रिंबकराव मुरकुटे
भा.ज.पा.जिल्हाध्यक्ष परभणी (ग्रा.)

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# खोटारडेपणाने दुसऱ्यांचे यश लाटणा-या नांदेड येथील स्वार्थी कोनाळे क्लासेसवर शिक्षणाधिकारी कारवाई करणार का...?

अंबाजोगाई / सुनिल सिरसाट

सैनिकी शाळा सगरोळी येथे गेली चार वर्षे निवासी, शिस्तबद्ध आणि तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनातून दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के गुण घेणारा प्रथमेश कामशेट्टे हा विद्यार्थी आमच्या कोनाळे क्लासेसचा असल्याचे सांगत कोनाळे क्लासेस नांदेड यांनी निर्लज्जपणाचा कळसच गाठला आहे. फुकटच श्रेय लाटून आपल्या क्लासेसचे यश दाखवून विद्यार्थ्यांचा प्रवेश मिळवणे आणि त्यामागे फिसच्या नावाखाली हजारो लाखो रुपये छापणे हा गोरख धंदा शिक्षणाधिकारी थांबवतील का ?त्यांच्यावर कारवाई करतील का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

कोनाळे क्लासेसचा प्रताप एवढ्यावरच थांबला नाहीतर त्यांनी दि. १८ मे रोजी दै. लोकमत वृत्तपत्रातून फोटोसह बातमी देखील प्रसिद्ध केली. बातमी प्रकाशित करण्या पूर्वी ना शाळेशी, ना पालकांशी संपर्क केला. शाळा प्रशासनाने कोनाळे क्लासेस नांदेड यांना याबाबत विचारणा केली असता त्यांची पुरती भांबेरी उडाली आणि मग त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

आहो कोनाळे जनाची नाहीतर मनाची तरी वाटु द्यायची ना...?

गरीब, होतकरू आणि हुशार मुलांच्या यशाचे श्रेय लाटून खोटारडी मार्केटिंग करताना शाळेचा, शिक्षकांचा, पालकांचा व विद्यार्थ्याचा एकप्रकारे या क्लासेसने घोर अपमानच केला आहे.दहावी नंतर त्याने पुढील


कॉमर्स News

राज्य, केंद्रीय बोर्ड परीक्षेत कोनाळे क्लासेसचे घवघवीत यश
तीन विद्यार्थ्यांनी मिळविले १०० टक्के गुण

लोकमत न्यूज नेटवर्क

अथर्व चाकुरे | ओमकार पवार | प्रथमेश कामशेट्टे

नांदेड : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकालात कोनाळे क्लासेसने अप्रतिम यश संपादन करुन कीर्तीमोल पल्ला गाठला आहे. ओंकार पवार आणि कामशेट्टे प्रथमेश या दोन विद्यार्थ्यांनी राज्य मंडळात तर चुकारे अथर्व याने केंद्रीय बोर्डात १०० टक्के गुण मिळवत नावलौकिक प्राप्त केला आहे. या विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची अथक मेहनत व कोनाळे क्लासेसच्या नियोजनबद्ध अभ्यासपद्धतीचे फलित आहे असे संचालक व्हि.डी. कोनाळे यांनी सांगितले.

या यशस्वी विद्यार्थ्यांव्यतिरिक्त १५७ हून अधिक विद्यार्थ्यांनी राज्य बोर्डात आणि २० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी केंद्रीय बोर्डात ९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केले.

गणितात मोरे सोहम, कदम सोहम, कराळे ऐश्वर्या, डाखोरे हर्षवर्धन, कोटलवार प्रस्तुश, सातपुते जानवी आणि हंगरगे गार्गी यांनी १०० पैकी १०० गुण तर विज्ञान विषयात मानधने वरद, बिरादार महिंद्र, हर्दळे सर्वज्ञ आणि केंद्रे अजिंक्य आणि संस्कृत मध्ये कुलकर्णी आदीश्री, चावरे सुश्रुत ... संस्कृती, कस्तु संस्कृती यांनी उत्कृष्ट कामगिरी केली, इंग्रजीत घंटेवाड श्रावणीने पैकीच्या पैकी गुण मिळविले.

कोनाळे क्लासेस केवळ नीट आणि जेईईसाठीच नव्हे तर दहावी फाउंडेशन अभ्यासक्रमांसाठीही ... मार्गदर्शन पुरवते. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, ... अभ्यास व योग्य नियोजन ... महाराष्ट्रात कोनाळे क्लासेस अग्रस्थानी आहे.



शिक्षण कुठे घ्यावे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु अशाप्रकारे खोटी बनावट जाहिरात करून त्याचे शैक्षणिक नुकसान हे क्लासेसवाले करुच कसे शकतात..? असा शिक्षणाचा बाजार भरवणा-या क्लासेसवर शिक्षण विभागाचे लक्ष नसते का..?शिक्षणाधिकारी काय करतात..? मग जर भविष्यात त्याचे नुकसान झाले तर त्याची जबाबदारी कोणाची शिक्षण विभागाची की क्लासेसची..?

तेंव्हा नांदेड जिल्हा शिक्षणाधिकारी यावर काय कठोर कारवाई करणार का? याकडेच आता संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागुन आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव निमित्त

# सिरसाळ्यात २ जून रोजी भव्य मिरवणूक, जय्यत तयारी सुरू..!

सिरसाळा राजयोग प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त म्हणजेच त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त येत्या २ जून २०२५ रोजी भव्य आणि उत्साही मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी सिरसाळा आणि परिसरातील धनगर समाज बांधवांमध्ये प्रचंड उत्साह असून, जय्यत तयारी सुरू आहे. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश काळे, उपाध्यक्ष लखन काळे आणि सचिव प्रकाश काळे यांनी या कार्यक्रमाची माहिती दिली असून, त्यांनी समाज बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

गावात उत्साहाचे वातावरण आणि जय्यत तयारी दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी सिरसाळ्यात अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. यंदाचा हा त्रिशताब्दी जन्मोत्सव असल्याने उत्साहात आणखी भर पडली आहे. परळी-बीड महामार्गावर रस्त्याच्या मधोमध असलेल्या सर्व पोलवर लावलेले पिवळे ध्वज लक्ष वेधून घेत आहेत ही तयारी पाहता, जयंतीच्या दिवशी होणारा उत्साह अधिकच वाढणार असल्याचे दिसत आहे. संपूर्ण गाव अहिल्यादेवींच्या प्रति आदराने नतमस्तक होण्यासाठी सज्ज झाले आहे.जयंती दिनी, सकाळी १० वाजता प्रतिमा पूजन आणि ध्वजारोहण करण्यात येईल. त्यानंतर दुपारी ४ वाजता गावभर अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली जाणार आहे. या मिरवणुकीत पारंपरिक वेशभूषा केलेले नागरिक, ढोल-ताशांचा गजर, आकर्षक चित्ररथ आणि अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याचे दर्शन घडवणारे देखावे सहभागी होणार आहेत. मिरवणूक सिरसाळ्यातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात येणार असून, पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये ती पाहण्यासाठी आणि त्यात सहभागी होण्यासाठी उत्सुकता दिसून येत आहे. या मिरवणुकीतून अहिल्यादेवींच्या कार्याला आदरांजली वाहण्यात येणार आहे.







आयोजक समितीच्या वतीने दिनेश काळे, सुनील काळे, मनोज काळे, गणेश गवळी, अक्षय काळे यांनी सिरसाळा परिसरातील सर्व समाज बांधवांना या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होऊन अहिल्यादेवींना आदरांजली वाहण्याचे आवाहन केले आहे.

# चेक बाउन्स प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता - ॲड. शशिकांत सावंत

प्रतिनिधी @ बीड

दिनांक २७/०५/२०२५ रोजी मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांनी कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंन्ट ऍक्ट प्रकरणामध्ये महत्त्वपूर्ण निकाल दिलेला असून आरोपीची अनादरीत धनादेशा प्रकरणी निर्दोष मुक्तता केलेली आहे.



प्रकरणाची हकीगत अशी की, सुनील महादेव नागरगोजे राहणार तिंतरवणी यांनी दिनांक ११/०१/२०१९ रोजी फिर्यादी बँक, स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड यांच्याकडून वाहन खरेदीसाठी कर्ज घेतले होते सदरचे कर्ज घेतेवेळी आरोपीकडून फिर्यादी पतसंस्था बँकेने सिक्युरिटी म्हणून एकूण २४ धनादेश घेतले होते आरोपी यांनी मुदतीत कर्ज फेडले नाही म्हणून फिर्यादी बँकेने सदर धनादेशा पैकी एक धनादेश बाउन्स करून आरोपीचे विरोधात मा.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयात समरी केस क्रमांक २७१/२०२० स्वराज्य महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड विरुद्ध सुनील महादेव नागरगोजे दाखल केला मा. न्यायालया मध्ये सदरचा खटला चालला परंतु आरोपीच्या वतीने घेण्यात आलेला डिफेन्स व युक्तिवाद ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केलेली आहे, सदरच्या प्रकरणामुळे बँकांनी सिक्युरिटी म्हणून घेतलेल्या धनादेशाचा बँका गैरवापर करत असल्याणे बँकांना ही मोठी चपराक मानली जाते.. आरोपीच्या वतीने ॲड. शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली त्यांना ड. विशाल कदम, ड. अभिषेक बहिर, ड. माऊली डाके, ड. मुकुंद लोणकर, ड. राजकुमार धरणे, ड. प्रदीप दराडे.ड. राम खोसे यांनी सहकार्य केले.

बँकेला सिक्युरिटी म्हणून दिलेल्या धनादेशाचा बँका सर्रासपणे गैरवापर करतात त्याची झळ बहुदा कर्जदारांना बसते, चक्रवाढ व्याज व पतसंस्थेचे अनागोंदी कारभार या निकालातून दिसून येतात, बँकेला दिलेला धनादेश आधारित झाल्याच्या प्रकरणातून आरोपीची निर्दोष मुक्तता बहुदा पहिलीच असावी त्यामुळे बँकांना व पतसंस्थेंना हा निकाल म्हणजे एक चपराक मानली जाते.



बीड - एक महान राष्ट्रभक्त अद्वितीय स्वातंत्र्यसेनानी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील सार्वजनिक जयंती उत्सव समिती व स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमास शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी उपस्थित राहून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने अभिवादन केले.यावेळी बीड शहरातील राजकीय सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



लातूर - आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे,आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त देविदास काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# बाजीराव भैय्या म्हणजे सामान्यांची तळमळ अन् टिका करणारे म्हणजे निव्वळ मळमळ - इम्रान पटेल

प्रतिनिधी @ बीड

बाजीराव चव्हाण यांचे नाव घेताच समोर एक तरुण उभा राहतो जो राज्यभर रंजल्या गांजल्यांची सेवा करणारा, रुग्णांसाठी कष्ट उपसणारा आहे. ज्याच्या प्रत्येक कामातून तळमळ दिसून येते. यामुळे बाजीराव चव्हाण हे राज्याचे भाऊ म्हणजे भैय्या बनले आहेत. पण काहींना ही प्रगती पचत नसून, कसलेही काम न करता कामे करणाऱ्यांवर टिका करणे इतकेच त्यांचे धंदे म्हणजे ते केवळ मळमळ झाले आहेत. ती आता लोकांना नकोशी वाटत असल्याची प्रतिक्रिया बाजीराव भैय्या समर्थक इम्रान पटेल यांनी व्यक्त केली.



नुकतेच बीडमध्ये युवासेनेचे बाजीराव चव्हाण यांनी एक कार्यक्रम घेऊन त्यात पक्ष वाढीसाठी फिरणाऱ्या निष्ठावंत तरुणांना आणखी बळ आणि वेळ मिळावा म्हणून एक दोन नव्हे तर चक्क चार स्कॉर्पिओ वाटप केल्या आहेत. या स्कॉर्पिओच्या चाव्या संबंधितांना सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते देण्यात आल्या आहेत. पण पक्षातील काहीजण कवडीचे काम न करता फक्त मराठवाड्यात मिरवून घेत असून, ऐत्याबिळात नागोबा या प्रमाणे पदाला वेटाळा घालून बसलेल्या पदाधिकाऱ्याने यावर टिका करुन आकलेचे तारे तोडले आहेत. त्याच्या म्हणण्यानुसार या स्कॉर्पिओ युवा सेनेच्या कार्यकर्त्यांना नव्हे तर कर्मचाऱ्यांना वाटल्या आहेत. पण त्याच्या हे लक्षात आले नाही की, हो ते नोकरासारखेच पक्ष आणि शिंदे साहेबांसाठी काम करतात. त्यांच्या आदेशानुसार ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करतात. यासाठी ते राज्यभर फिरुन सर्वसामान्य रंजल्या गांजल्यांची सेवा करुन प्रत्येक झोपडी पर्यंत शिंदे साहेबांचे नाव पोहोचवित आहेत. तेही कसलेही म्हत्वाचे पद नसताना केवळ शिंदे साहेबांचा शिवसैनिक म्हणून काम करतात. त्यांची तळमळ पाहून त्यांना हे बक्षीस मिळाले आहे. पण पद असूनही फक्त स्वतःच्या फायद्यासाठी वापर करणाऱ्यांची ही मळमळ बाहेर पडणं अपेक्षितच होतं. त्यामुळे मळमळ करणाऱ्यांनी काम करावे अन् नंतर बोलावं असा सल्ला बाजीराव भैय्या चव्हाण यांचे कट्टर समर्थक इम्रान पटेल यांनी कोणाचेच ना घेता प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.



# शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत डॉ.ज्योती मेटे यांनी घेतली कलेक्टरची भेट

प्रतिनिधी @ बीड

बि - बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली.

या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

# धार्मिक ऐक्यासाठी समस्त जातींचे संघटन करण्याचे कार्य स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केले

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी @ बीड

हिंदूंच्या धार्मिक संघटनासाठी सर्वप्रथम समस्त जाती एकत्र यायला हव्यात. सर्वांना समान वागणूक आणि न्याय मिळाला पाहिजे, हा विचार मांडत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी विविध कृतिशील उपक्रम राबवत सामाजिक ऐक्य प्रस्थापित केले. त्यांनी स्वधर्माचे जागरण करताना कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त शहरातील जवाहर कॉलनी येथील सावरकर पुतळ्याजवळ वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर बोलत होत्या.

डॉ.क्षीरसागर पुढे म्हणाल्या की, सावरकर हे भारताचे महान स्वातंत्र्यसेनानी व देशभक्त होते. त्यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला. काळ्या पाण्यासारख्या कठोर छळास तोंड दिले, पण आपली देशभक्ती आणि सेवा कधीच सोडली नाही. त्यांच्या विचारांना जनमानसात पोहोचवण्यासाठी मी स्वतः प्रयत्नशील राहणार आहे. सावरकर पुतळा परिसरात सुसज्ज ग्रंथालय आणि भव्य भगवा ध्वज उभारण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी प्रा.चंद्रकांत मुळे, डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सलीम जहाँगीर, भाजपाचे बीड शहराध्यक्ष अशोक लोढा,



शिवसेनेचे नितीन धांडे, गिरीश देशपांडे, डॉ.पी.के. कुलकर्णी, ड.उद्धव रासकर, पत्रकार प्रमोद कुलकर्णी आदी मान्यवरांनी सावरकरांच्या कार्याचा गौरव करत भाषणे केली. प्रास्ताविक डॉ. अजिंक्य पांडव यांनी केले. आभार महेश वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमात उपस्थितांनी सावरकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ड.मिलिंद वाघिरकर, माजी प्राचार्य विजेंद्र चौधरी, डॉ. गणेश आडगांवकर, ड.प्रशांत देशपांडे, ड.अमित हसेगावकर, ड.जितेंद्र पांडव, संतोष चिंचोलकर, त्रिंबक देशपांडे, डॉ.मनोज पोहणेरकर, संतोष पारगावकर, डॉ. स्वप्नील उन्हाळे, वल्लभ गोडबोले, दीपक रुपदे, ड.आनंद पाटील, डॉ.राजेश भुसारी, संदीप खडकिकर, विजय कोटुळे, गंगाधरराव देशमुख, राम कुलकर्णी, मिलिंद शिवणिकर, डॉ.विनोद मुळे, एकनाथ टेपाले, हेमंत जोशी, राहुल भालेराव, ड. नरेंद्र जवळेकर, मुकुंद कुलकर्णी, अभिजित वैद्य, प्रसाद अंदुरकर, सुनील देशमुख, संजय डोळे, प्रकाश गोरकर, डॉ. छत्रपती वैरागर, नरेंद्र देशपांडे, रत्नाकर कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, प्रकाश चैतन्य, वैभव देशमुख, सुनील खजानदार, संतोष जोशी आदी सावरकरप्रेमी नागरिक उपस्थित होते.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# चांद-सूरज नाल्यावरील पुलाचे काम दोन वर्षापासून रखडले

## मुसळधार पावसामुळे शहागड-पैठण महामार्ग पडला बंद, वाहनधारकांना मनस्ताप

**प्रतिनिधी @ शहागड**

शहागड पावसाळ्याच्या दिवसात जोरदार पाऊस पडल्यानंतर शहागड पैठण महामार्गावरील चांद-सूरज नाल्यावरील पुलावरून धोकादायक पाणी वाहते. त्यामुळे पाणी कमी होईपर्यंत पावसाळ्यात या महामार्गावरील वाहतुक कित्येकदा बंद ठेवावी लागत असल्याची स्थिती आहे. एका वर्षापासून उंची, रुंदी वाढविण्यासाठी हा पूल खोदुन ठेवलेला आहे.

मागील दोन वर्षांपासून पुलाच्या कामाला मुहर्तच लागलेला नाही. काम सुरू करून ते पूर्ण करावे यासाठी अनेकांनी आंदोलन केले आहे. संबंधित विभागाने केवळ पोकळ आश्वासने दिली आहेत.शहागडसह परिसरात दि. २० मे पासून मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे शहागड-पैठण महामार्गावरील



चांद-सूरज नालया वरून पाणी जात असल्याने सोमवारी सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत वाहतूक ठप्प होती.मागील वर्षी देखील मुसळधार पावसामुळे नाल्यावर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती. परंतु, तरी देखील संबंधित प्रशासनाकडून काम पूर्ण करण्यात आले नाही.मागील दोन वर्षापासून नाल्याची दुरूस्ती करण्यासाठी तो खोदून ठेवण्यात आलेला आहे. यंदा मे महिन्यातच पावसाला सुरूवात झाल्याने वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

वाहतूक कोंडीची समस्या..

चांद-सूरज नाल्यावरील पूल खोदून उन्हाळा, पावसाळा आला तरीही पुलाच्या कामाला मुहूर्त लागलेला नाही. त्यामुळे नागरिक व वाहन चालकांना जीव धोक्यात घालून पाण्यातून प्रवास करावा लागत आहे. यामुळे संबंधित प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव

**प्रतिनिधी @ परळी**

## ना. पंकजाताई मुंडेंनी कार्यकर्त्यांसह वैद्यनाथ मंदिरात केली स्वच्छता ; महा आरतीही केली

आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवानिमित्त परळी भाजपच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या जयंती उत्सवात ना. पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होऊन स्वच्छता मोहिमेत भाग घेतला. कुशल प्रशासक, कर्तव्यतत्पर आणि न्यायप्रिय राज्यकर्त्या अहिल्यादेवी होळकर यांची तत्व अंगीकरून आम्ही लोकसेवेची कार्य करत आहोत, त्यांची शिकवण सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याची भावना पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने परळी भाजपने राज्याच्या पशूसंवर्धन आणि पर्यावरन व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यनाथ मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम आणि महाआरती आयोजित केली होती. ना.



पंकजाताई मुंडे यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांसह मंदिर परिसर स्वच्छ केला. तसेच मंदिर परिसरात असलेल्या अहिल्यादेवींच्या पुतळ्यासमोर महाआरती करून त्यांना वंदन केले. यावेळी 'यळकोट यळकोट, जय मल्हार' आणि अहिल्यादेवींच्या नाम घोषाने परिसर दणाणून गेला होता. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते राजेश देशमुख, सतीश मुंडे, मंडल अध्यक्ष राजेश गिते, बंडू निर्मळ, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, पवन मुंडे, रवि कांदे, प्रकाश जोशी, नितीन समशेट्टे, अरूण पाठक, मोहन जोशी, बळीराम गडदे, चंद्रकांत देवकते, संजय मुंडे, प्रशांत कराड, प्रितेश तोतला, आश्विन मोगरकर, अनिश अग्रवाल, सुशील हरंगुळे, राजेंद्र ओझा, ज्ञानोबा सुरवसे, सचिन गिते आदींसह कार्यकर्ते

## द्वा.मं.राजस्थानी विद्यालयाच्या गेट टुगेदर समारंभात निवेदक

## सुरेश साळुंकेंनी भरले आनंदाचे नवरंग

**प्रतिनिधी @ बीड**

जिल्ह्यातील सुप्रसिद्ध स्व द्वा.मं.राजस्थानी विद्यालयामध्ये सन १९९७-९८ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलन आयोजित केले होते.या गेट टुगेदर कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदक तथा राजस्थानी विद्यालयाचे माजी विद्यार्थी निवेदक सुरेश साळुंकेंना निवेदनासह शालेय जीवनातील खेळ, आठवणींना आगदी उद्घाटन सोहळ्या पासुनच इंद्रधनुष्याचे एक एक मनमोहक रंग भरायला सुरुवात केली. त्यामुळे प्रत्येक क्षण आनंदाने मोहरुन गेला होता.विनोदीशैलीने निवेदन करताना ह्रदयास स्पर्श केला. यावेळी त्यांना शिकवलेल्या आर.बी.सोनीसर , रामेश्वरजी कासट गुरूजी , कोकणेसर , भाऊसाहेब पवार , एकशिंगेसरांच्या शुभहस्ते निवेदक सुरेश साळुंके यांचा सत्कार करण्यात आला.

# जिजांनी सदैव लेकीसारखी माया आणि 'ताईसाहेब म्हणत नेता म्हणून सन्मान केला

## देशमुख परिवाराला कधीही अंतर देणार नाही - ना.पंकजाताई मुंडे

**प्रतिनिधी @ परळी**

स्व. आर.टी. देशमुख (जिजा) यांच्यासारखा जीवाभावाचा देवमाणूस आता पुन्हा होणे नाही. माझ्या संपूर्ण जीवनात एक परिवारातील सदस्य म्हणून त्यांनी सदैव माझ्यावर लेकीसारखी माया केली आणि मी नेतृत्व करताना 'ताईसाहेब' म्हणत नेता म्हणून माझा सन्मान केला. अशा सालस, सोज्वळ व निष्ठावान व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने खूप मोठी हानी झाली आहे. त्यांच्या माघारी देशमुख परिवाराला मी कधीही अंतर देणार नाही अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी स्व.आर.टी. देशमुख यांना अखेरचा निरोप दिला.

माजलगाव मतदार संघाचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचे परवा दुर्दैवी अपघाती निधन झाले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आपले सर्व कार्यक्रम व दौरे रद्द करून त्या या कुटुंबाला आधार देत तीन दिवस परळीतच थांबल्या. स्व.आर.टी. देशमुख यांच्या पार्थिवावर आज शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. ना. पंकजाताई मुंडे यांनी सरकारच्या वतीने त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करताना पंकजाताई मुंडे भावूक झाल्या होत्या. त्यांनी सांगितले की, दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यापासून आमचे देशमुख परिवाराशी पारिवारिक स्नेहबंधाचे नाते आहे. माझ्या जीवनातील प्रत्येक बाबीत जिजा हे कुटुंबातील सदस्यां प्रमाणेच आमचे आधारवड राहिलेले आहेत. राजकीय, सामाजिक व कौटुंबिक अशा सर्व स्तरावर भक्कम



आधार देत त्यांनी मुंडे साहेबांपासून व नंतर माझ्यासोबत अतिशय निष्ठेने, तळमळीने व प्रामाणिकपणे काम केले. मुंडे साहेबांच्या जाण्यानंतर त्यांनी सदैव माझा ताईसाहेब असाच उल्लेख केला. गेल्या २०-२२ वर्षात एकदाही त्यांना रागावल्याचे मी पाहिलेले नाही. असा सालस, सोज्वळ आणि निष्ठावंत ज्येष्ठ सहकारी गेल्याचे अतीव दुःख आहे. स्व. जीजांनी माझ्यावर लेकीसारखे प्रेम केले आणि नेता म्हणून नेहमीच सन्मान राखला. एक लेक म्हणूनच या परिवाराशी आयुष्यभर आपला स्नेह राहणार असुन जिजांच्या जाण्यानंतर देशमुख परिवाराला आपण कधीही अंतर देणार नाही असं नामदार पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

## भारत जिंदाबाद रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन -- अविनाश जावळे

**प्रतिनिधी @ माजलगांव**

देशाच्या सैनिकांनी युद्धखोर पाकिस्तानची कुमकुम जिरवली भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी रिपाईच्या वतीने आयोजित केलेल्या भारत जिंदाबाद रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की,मी प्रथम भारतीय आणि अंतिम ही भारतीय आहे.यामुळे देशाचे सार्वभौमत्व महत्त्वाचे आहे. भारतीय सैनिकांनी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील अतिरेकी तळ उध्वस्त केले.देशासाठी लढलेल्या सैनिकाचे मनोबल उंचविण्यासाठी आणि त्यांच्या शौर्यास सलाम करण्यासाठी रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले साहेब यांच्या आदेशानुसार व रिपाईचे प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली बीड येथे



दि.३० मे रोजी भारत जिंदाबाद रॅली आयोजीत केली आहे.ही भारत जिंदाबाद रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत आयोजित केली आहे.भारत जिंदाबाद रॅलीत माजलगाव तालुक्यातील रिपाईच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे वाहन तालुका अध्यक्ष अविनाश जावळे यांनी केले आहे.भारत जिंदाबाद रॅली तालुक्यातील जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी सहभागी होण्यासाठी अविनाश जावळे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी

# भारत जिंदाबाद रॅलीत कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे - महेश आठवले

**प्रतिनिधी @ बीड**

भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे.

ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे. भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाइं कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे रिपाइं युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, साहील सवाई,योगेश वाघमारे,आनिकेत अरुण,राहुल कोकाटे, विशाल काबंळे, संकेत गायकवाड,आमोल जाधव, मिलिदं डोळस,निखिल ससाणे, नामदेव वाघमारे,ज्ञानेश्वर केंगार,

वैभव गुलवेने,सिद्धेश्वर केंगार, शंकर येडवे, बालूराम केंगार, आदींनी केले आहे.



केज - श्याम विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय दहिफळ वडमाऊली तालुका केज येथे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बळी गुरुजी, भोसले पी एस सर, श्रीमती ठोंबरे आय.डी. मॅडम, गदळे के. इ, कल्याण आंधळे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी. (छाया तात्यासाहेब डोईफोडे)



## ओळख पटविण्याचे आवाहन

सदरील फोटोमध्ये दिसत असलेल्या अज्जी या आज दुपारी दोन वाजल्यापासून पेठ बीड परिसरातील काळा हनुमान ठाणा भागात बसलेल्या आहेत, त्या भोळसर असल्याने स्वतःचे नाव गाव सांगत नाही जर या अज्जी बाबत काही माहिती असल्यास त्यांनी पेठ बीड पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा किंवा

रुग्णसेवक पत्रकार अमजद खान मोबाईल क्रमांक ९२०६८७८७८८

यांना संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे

## आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी

## सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**प्रतिनिधी @ लातुर**

जिल्ह्यात सुरु झालेल्या मॉन्सूनपूर्व पावसाने पिकांचे नुकसान झाले आहे.मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने लातूर शहरातील अनेक भागातील घरांमध्ये पाणी शिरले असून रस्त्यांवर पाणी जमा झाल्याचे दिसून आले.अशा परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या निर्देशानुसार तातडीने दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त देविदास काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. ४सलीम शेख यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# शिवसेनेच्या माध्यमातून नेहमी जनतेच्या हिताची कामे करु : सचिन मुळूक

## स्वराज्य नगरमधील ३० लक्ष रुपयांच्या रस्ता कामाचा मुळूक यांच्या हस्ते शुभारंभ

**प्रतिनिधी @ बीड**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसैनिकांना मतांचे राजकारण नाही तर जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करण्याची शिकवण दिली आहे आणि आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून नेहमीच जनतेच्या हिताचे काम करण्यास आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देत आहोत. याचाच एक भाग म्हणून आज स्वराज्यनगर भागातील वीस वर्षांचा प्रलंबित रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत असल्याने मनस्वी आनंद होत असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

बीड शहरातील प्रभाग क्रमांक २२ स्वराज्य नगरमध्ये गेल्या २० वर्षापासून रस्ता व नालीचा गंभीर प्रश्न होता. कामाचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. स्वराज्य नगर मधील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास होता. गेल्या वीस वर्षांपासून स्वराज्यनगर वासियांचा रस्ते व नाल्यांची मागणी होती. यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी पाठपुरावा केल्याने ३० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला. मुळूक यांच्या माध्यमातून स्वराज्य नगरमधील सिमेंट रस्ता व नाली बांधकामाला सुरुवात झाली आहे. यामुळे नागरिकांना नक्कीच दिलासा मिळणार आहे. यावेळी जिल्हाप्रमुख मुळूक म्हणाले की, गेल्या वीस वर्षांपासून या भागातील नागरिकांना झालेला त्रास विचारात घेऊन दीर्घकाळ टिकेल अशा प्रकारचा रस्ता करण्याचे काम आता हाती घेण्यात आले आहे. यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणारी अडचण दूर होईल. याशिवाय, या भागाचे स्वरूप बदलून ते अधिक सुंदर आणि स्वच्छ होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून बीड शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन शहरात विविध



ठिकाणी विकासाची कामे करु असे मुळूक म्हणाले. यावेळी रवि शिंदे,विकास निकम .आबासाहेब लांडे,संभाजी धोंडगे,बाळासाहेब पिंगळे,शरद पवार,योगेश नाईक,जगदाळे काकू,नेहरकर काकू,मेढकर काकू,पवार काकू,वडचकर काकू,पांचाळ काकू सह परिसरातील सर्व नागरिक उपस्थित होते.

## मुहम्मद उमर सीबीएसई दहावी परिक्षेत ९५.४% विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

**प्रतिनिधी @ बीड**

सीबीएसई दहावी बोर्ड परिक्षेत अपेक्स बालरुग्णालयाचे डॉ. मुहम्मद इज़हार जावीद आणि डॉ. नाज़ीया मुहम्मद इज़हार जावीद (त्वचा रोग तज्ञ) यांचा गुणवंत मुलगा मुहम्मद उमर याने सीबीएसई दहावी परिक्षेत ९५.४% गुण घेत विशेष प्राविण्याने घवघवीत यश संपादन केले आहे. मुहम्मद उमर याने पुढील जीवनात वडिलांप्रमाणेच डॉक्टर होऊन बालरोग तज्ञ होण्याचा मानस व्यक्त केला आहे.मुहम्मद उमरच्या अलौकिक यशाबद्दल त्याचे आजोबा ऑडिटर मुहम्मद अब्दुल गफ्फार, मोठे काका अपेक्स मेडीकलचे मालक अब्दुल खालेक, लहान काका डॉ. मुहम्मद अब्दुल माज़ीद (मेंदू विकार शल्यचिकित्सक) मॅक्स कॅयर हॉस्पिटल, अहेमदनगर व लहान काकी, डॉ. मरियम मुहम्मद अब्दुल माजीद (स्त्री रोग तज्ञ) मॅक्स कॅयर हास्पिटल, अहेमदनगर आणि (नेत्र तज्ञ) अज़हर जमील व (इंजिनियर) शाहेद लतीफ आणि पोद्दार इन्टरनॅशनल स्कुल बीडचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, नातेवाईक, मित्र परिवाराकडून त्याचे अभिनंदन करून भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहे.

# पालीकेकडून अतिक्रमण विरोधी मोहीमेचा फुसका बार..?

## एक टपरी जप्त करत अर्ध्या तासातच मोहीम गुंडाळली
## पालीकेच्या जबाबदार अधिकाऱ्यांची मोहीमेकडे पाठ

पूर्णा(प्रतिनिधी)

येथील पूर्णा पालीकेने मोठा गाजावाजा करुन शहरातील अतिक्रमण मोडीत काढण्यासाठी आखलेली मोहीम पालीकेला अर्ध्या तासातच आटोपती घ्यावी लागल्याची नामुष्की पालीकेवर ओढवली आहे.हाती घेतलेल्या मोहीमेत पालीकेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पाठ फिरवल्याने अतिक्रमण विरोधी पथकाने रेल्वे स्थानक रस्त्यावरील केवळ एकमेव टपरी जप्त करून काही वेळातच काढता पाय घेतला.यामुळे पालीकेची ही मोहीम फुसका बार ठरल्याच्या चर्चेला उधाण आले आहे.पूर्णा नगरपालिकेने शहरातील वाढलेले अतिक्रमण काढण्यासाठी पालिकेकडून मागील दोन दिवसांपासून शहरांमध्ये जागोजागी दोन्ही क्षेपणाद्वारे अतिक्रमण धारकांना सूचनाही दिल्या गेल्या होत्या.प्रत्यक्षात मंगळवार दि.२७ मे रोजी अतिक्रमण मोहीमही हाती घेतली होती. परंतु पालिकेच्या या अतिक्रमण मोहिमेचा पुरता फज्ज्या उडाल्याचे चित्र पहावयास मिळाले. अतिक्रमण काढण्यासाठी पालिकेचे सफाई विभागातील क्षत्रिय अधिकारी तसेच काही कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते.रेल्वे स्थानक परिसरातील रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.परंतु या मोहिमेकडे पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांसह कार्यालयीन अधीक्षक, नगर, पाणीपुरवठा स्वच्छता, विद्युत अभियंते यांनी मात्र पाठ फिरवल्याचे दिसून आले.

### पोलिस बंदोबस्त मिळताच मोहीम सुरू करणार – मुख्याधीकारी गुट्टे

पालिकेच्या मुख्याधिकारी उत्कर्ष गुट्टे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी दिलेल्या माहितीनुसार पालिकेने शहरातील अतिक्रमण मोडीत काढण्यासाठी अतिक्रमण विरोधी मोहीम मंगळवारी आखली होती.परंतु मोहीम यशस्वी पार पाडण्यासाठी पोलीस फोर्स मिळाला नाही.त्यामुळे येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये पोलीस फोर्स मिळाल्यानंतर शहरातील वाढलेले अतिक्रमण पूर्णतः साफ करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

दरम्यान रेल्वे स्थानक ते चर्च रस्त्यावर मोठ्या प्रमाणात

अतिक्रमणधारकांनी बस्तान बसवले होते. पालिकेने केलेल्या आवाहनानंतर काही अतिक्रमणधारकांनी आपापले टपऱ्या पत्रे आधी साहित्य उचलून नेले तर बहुतेक अतिक्रमण धारकांनी पालीकेच्या आवहानास प्रतिसाद दिला नाही.शेवटी पालखीच्या अतिक्रमण विरोधी पथकाने रेल्वे स्थानक परिसरातील केवळ एकमेव टाकील टपरी उचलत ही होईल केवळ अर्ध्या तासातच आटोपती घेतली.शहरातील आनंद नगर आदर्श कॉलनी अली नगर बस स्थानक बोर्डीकर प्लॉटिंग परिसरात जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांना तसेच महिलांना या रस्त्याने जाणे फार जिकरचे झाले होते

त्यामुळे अनेकांनी याबाबत पालिकेकडे तक्रारीही केल्या होत्या. यानंतर पालिकेकडून अतिक्रमण साफ करून रस्ता मोकळ्या करण्यास मुहूर्त मिळाला होता परंतु तो यशस्वी झाल्याने शहरात पालिकेने अतिक्रमण मोहिमेचा फुसका बार वाजवला असल्याची चर्चा ऐकावयास मिळाली. बारगळलेली ही मोहीम पालिका पुन्हा हाती घेणार का शहरातील वाढलेली अतिक्रमण जमीन दोस्त करणार का.? कि 'मी रडतो, तु हाण' या म्हणी प्रमाणे सोंग करणार, याकडे आता पूर्णा शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.






# जिंतूर-यलदरी रस्त्याच्या दुरवस्थेवरून नागरिकांचा संताप

तिरडी यात्रा काढून सार्वजनिक बांधकाम विभागाला जागे करण्याचा प्रयत्न

जिंतूर (प्रतिनिधी)

जिंतूर–यलदरी रस्त्याच्या अत्यंत खराब अवस्थेमुळे वैतागलेल्या स्थानिक नागरिकांनी दिनांक २८ मे रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यासाठी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले नागरिकांनी तिरडी यात्रा काढत विभागाला 'जागं' करण्याचा प्रयत्न केला.विशेष म्हणजे,या आंदोलनात तृतीयपंथीयांचा देखील उत्स्फूर्त सहभाग होता.

विदर्भ व मराठवाड्याला जोडणारा मुख्य रस्ता आहे शिवाय जिंतूर तालुक्यातील अनेक गावांना जाण्यासाठी एकमेव रस्ता आहे मात्र मागील काही दिवसांपासून रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ता अशी अवस्था झाली सध्या वाहनधारकांना अपघाताचा धोका रोजचाच झाला आहे. पावसाळा सुरू असल्याने खड्यात पाणी साचत असल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्ण ठप्प होण्याची शक्यता आहे.या रस्त्यावरून शाळकरी मुले,रुग्ण आणि शेतकरी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे म्हणून नागरिकांनी एकत्र येत अनोख्या तिरडी यात्रेत नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग – ठखझ, रस्ता मरेपर्यंत प्रतीक्षा करू नका अशा फलकांसह रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी तिरडी यात्रा काढली विशेष म्हणजे तिरडी यात्रेत तृतीयपंथीयांनी देखील या आंदोलनात सामील झाले होते

आगामी काळात प्रशासनाने यावर तात्काळ उपाययोजना न केल्यास पुढील काळात रस्त्यावर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काजळे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अँड माधव दाभाडे, रिपब्लिकन सेना जिल्हाध्यक्ष प्रितम वाकळे,दामू नवले,गजानन वाघमारे,योगेश हलगुंडे,अभिषेक चव्हाण,ऋषिकेश चव्हाण,द्यानेश्वर काकडे,प्रदीप गायकवाड,पवन काकडे,संतोष नवले,अनिल गाडेकर,किशोर मोरे आदीजन आंदोलनात सहभागी होते

जिंतूर यलदरी खराब रस्त्यावर भिक मागून उदरनिर्वाह करतो परंतु खराब रस्त्यामुळे आमच्यासमोर अनेक अपघात झाले आहेत त्यात अनेकांचा मृत्यू झाला तर काही जण अपंग झाले आहेत म्हणून आम्ही तिरडी आंदोलनात सहभागी झाले आहेत

– संजना जाधव (तृतीयपंथी)

सार्वजनिक बांधकाम विभागाचे आंदोलकांना लेखीपत्र दिले असून रस्त्याचे काम काम मंजूर आहेत ते लवकरच चालू होईल व सध्या रस्त्यावर पडलेल्या खड्डे बुजविण्यात येणार असल्याचे कळवले आहे










# आषाढी वारी सर्व विभागांच्या समन्वयातून यशस्वी करा-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

## आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा

प्रतिनिधी @ मुंबई



पंढरपुरची आषाढी वारी पूर्वापार चालत आलेली परंपरा असून वारी आणि वारकरी राज्याचे वैभव वाढविणारी आहे. यामुळे यंदा पावसाचे आगमन लवकर झाल्याने सर्व मानाच्या पालख्यांना आणि वारकऱ्यांना फिरती शौचालये, पाणी, आरोग्य आणि पोलीस बंदोबस्तासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. ही वारी यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रयत्न करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आध्यात्मिक आघाडीचे तुषार भोसले, यांच्यासह वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मानाच्या १० दिंड्यांचे प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते.

पुण्याच्या प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे वारीच्या तयारीची माहिती सादरीकरणातून दिली. त्यानंतर प्रमुख दिंडीचे प्रतिनिधी, विश्वस्त यांनी वारीसंबंधात सूचना, अडचणी मांडल्या. पुणे शहराच्या ठिकाणी विविध स्वागत मंडप, लाऊड स्पीकरवर बंदी असावी, प्रत्येक पालख्यांना जास्तीचा पोलीस बंदोबस्त, अरूंद रस्त्यांचे रूंदीकरण, वाखरी मॉडेल वारकरी तळ, पालखीसोबत साध्या अम्ब्युलन्ससोबत कार्डियाक अम्ब्युलन्स, दर्शन पासची संख्या, वॉटर प्रूफ टेंट, पाण्याचे टँकर, मुबलक औषध साठा, पालख्यांच्या पारंपरिक मार्गाचा विकास, फिरती शौचालये, वाखरी वारकरी तळ मॉडेल करण्याच्या सूचना मांडण्यात आल्या.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, वारीचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आयुक्तांनी पालख्यांच्या स्वागतासाठी वेगळी व्यवस्था करावी. रस्त्याच्या बाजूला मंडप टाकून स्वागत करावे, मात्र पालख्यांना विलंब होवू नये, याची दक्षता घ्यावी.

विभागीय आयुक्तांनी समन्वयाने काम करावे

राज्यातील विविध भागातून पालख्या पंढरपूरला येतात. नाशिक, विदर्भ, मराठवाडा याठिकाणाहून येणाऱ्या पालख्यांना पालखी मार्गात सोयीसुविधा देण्यासाठी नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागीय आयुक्तांनी समन्वयांनी बैठक घेवून उपाययोजना कराव्यात. आपापल्या जिल्ह्यातून पालख्या जाताना स्थानिक प्रशासनाने रस्ते, पाणी, वीज, पोलीस बंदोबस्त, आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी तत्काळ बैठका घेवून नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

पोलीस महासंचालक यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी योग्य समन्वय करून पालख्यांच्या बंदोबस्ताची, वाहतूक, अपघात होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. किमान महत्वाच्या मानाच्या पालख्यांना सेवा राहील याची व्यवस्था करावी. जिल्ह्याची हद्द संपते तेव्हा पोलीस बंदोबस्तावेळी दुसऱ्या जिल्ह्याने अगोदरच हजर राहून कोणतीही पालखी, दिंडी पोलिसांविना राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

वाखरी मॉडेल वारकरी तळ करणार

सर्व संतांच्या मानाच्या पालख्या वाखरीजवळ एकत्र येतात. राज्यभरातून शेकडो पालखी सोहळे पायी पंढरीची वाट चालत असताना पालख्यांच्या स्वागतासाठी संत नामदेव महाराजांची पालखी वाखरी येथे जातात. यामुळे याठिकाणी पालख्यांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते. सोलापूर जिल्हा प्रशासनाने गर्दी नियंत्रणात राहण्यासाठी योग्य नियोजन करून दक्षता घ्यावी. नामदेव महाराज यांचा असलेला ओट्याचा पुनर्विकास करावा. गर्दी लक्षात घेवून वाखरीचे विशिष्ट मॉडेल वारकरी तळ होण्यासाठी आराखडा तयार करणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली.

यावर्षीही राहणार समूह विमा

पंढरपूर येथील वारीमध्ये दरवर्षी सुमारे १५ ते २० लाख वारकरी सहभागी होतात. पंढरपूर दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास या संदर्भात संबंधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने मागील वर्षी 'विठ्ठल रखुमाई वारकरी विमा छत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय घेतला. यावर्षीही वारीमध्ये सामील होणाऱ्या वारकऱ्यांना समूह विमा राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मानाच्या पालखीमधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

निर्मल वारी, हरित वारीसाठी काम वाढवून आराखडा करा

वारी कालावधीमध्ये निर्मल वारी, हरित वारी हा उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. पालखी मार्गातील त्या-त्या जिल्ह्यातील प्रशासनाने निर्मल वारीचे अधिक काम होण्यासाठी प्रयत्नशील रहावे. शिवाय हरीत वारीने निसर्गाशी साधर्म्य राखण्यास मदत होत असल्याने याकडे गांभीर्याने पहावे. रस्त्याच्यी दुतर्फा देशी, सावली देणारी झाडे लावण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

३६ वॉटर प्रुफ मंडप

राज्यात पावसाचा जोर राहणार असल्याने वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी पालखी मुक्काच्या ठिकाणी ३६ वॉटर प्रुफ मंडपाची तयारी केली आहे. आवश्यकता भासल्यास आणखी वॉटर प्रुफ मंडप वाढविण्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.वारीमध्ये प्रयागराजच्या धर्तीवर महिलांचाही विचार करण्यात आला. हिरकणी कक्षासह महिलांना स्नानासाठी वेगळी स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यंदा राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने विविध मानाच्या पालख्यांच्या सूचना लक्षात घेवून वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता शासन घेणार आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. फिरते शौचालये, शुद्ध पिण्याचे पाणी, वीज, वॉटर प्रुफ टेंट, जास्तीत जास्त आरोग्यसुविधा पुरविण्यात येणार आहे. अम्ब्युलन्सबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता आरोग्य विभाग घेईल. महिलांच्या आरोग्याबाबतही विशेष काळजी घेण्यात आली असून वारकऱ्यांना अधिक बसेस, रेल्वे उपलब्ध होण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. रस्त्यावर चिखल होणार नाही, ते सुस्थितीत राहतील याची दखल घेवू, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.यावेळी वारकरी, पालख्यासाठी विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीने केलेल्या सोयीसुविधांबाबतची माहिती सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर यांनी दिली.यावेळी विविध पालखी संस्थानच्या वतीने योगी निरंजननाथ, चैतन्य कबीर महाराज, जालिंदर मोरे, सोमनाथ घाटेकर, अक्षय महाराज भोसले, श्री. साधू यांनी समस्या, सूचना मांडल्या.



## मुख्यमंत्र्यांच्या सभेची भाजपा, परभणी महानगरकडून जोरदार तयारी सुरू..

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब उद्या परभणी दौऱ्यावर येणार आहेत. शहरातील प्रियदर्शनी स्टेडियम येथे 'विकासपर्व जाहिरसभेस' संबोधित करणार आहेत. त्यानिमित्त आज पालकमंत्री मेघनादीदी बोर्डीकर व भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या अध्यक्षतेखाली परभणी महानगर जिल्ह्याची नियोजन बैठक पालकमंत्री मेघनादीदी बोर्डीकर यांच्या संपर्क कार्यालयावर घेण्यात आली. 'विकासपर्व जाहिरसभेस' सर्व परभणीकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.यावेळी पालकमंत्री मेघनादीदी बोर्डीकर, महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, मा. जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, डॉ.केदार खटिंग, बाळासाहेब जाधव यांच्यासह भाजपा परभणी महानगरचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदिवासी विकास विभागातील गृहपाल पदाच्या भरतीची कागदपत्र तपासणी ३० मे रोजी

प्रतिनिधी @ बीड

अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग अमरावती विभागातील गृहपाल (पुरूष) व गृहपाल (स्त्री) या पदांची मुळ दस्तऐवज, कागदपत्र पडताळणीसाठी ३० मे, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ, टी.बी. हॉस्पीटलच्या मागे, अमरावती या ठिकाणी https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीतील उमेदवारांनी ऑनलाईन केलेला अर्ज व ऑनलाईन अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने सर्व मुळ दस्ताऐवज व २ छायांकित प्रतीसह उपस्थित राहण्याची नोंद घ्यावी तसेच सदर यादीतील उमेदवारांचा समावेश म्हणजे आदिवासी विकास आयुक्तालयाद्वारे नोकरीची हमी नव्हे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी असे प्रादेशिक निवड समितीचे अध्यक्ष तथा अपर आयुक्त जितेंद्र एन.चौधरी यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

## पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे अरेबियन ज्वेलर्स बीडकरांना गंडवून फरार : प्रा.सचिन उबाळे

### सहा महिन्यांपूर्वीच पोलिसांना निवेदनाद्वारे दिली होती माहिती

प्रतिनिधी @ बीड

शहरातील मल्टिस्टेट, पतसंस्थांचे प्रकरण गाजत असतानाच अरेबियन ज्वेलर्सच्या नावाखाली मोठे अमिष दाखवून नागरिकांची लूट होत असल्याचा प्रकार बीडमध्ये अनेक महिन्यांपासून सुरू होता. या प्रकरणी २३ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड शहर पोलिस ठाणे व पोलिस अधीक्षकांना निवेदनही दिले होते. मात्र पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. आज अरेबियन ज्वेलर्स चालक बीडमधून फरार झाल्याचे उघड झाले असून केवळ पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडला आहे असा आरोप स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा,सचिन उबाळे यांनी केला आहे. अरेबियन ज्वेलर्सकडून शहरातील नागरिकांना गंडविले जात असताना या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी उबाळे यांनी केली होती. मात्र पोलिसांनी या प्रकाराकडे साफ दुर्लक्ष केल्याचे उबाळे यांनी म्हटले आहे.




बीड शहरातील कारंजा रोड भागात अरेबियन ज्वेलर्सच्या माध्यमातून अवैध लॉटरी कुपन विक्री करुन नागरिकांना गाड्या, सोने देण्याचे आश्वासन देत आर्थिक लूट केली जात होती. पोलिसांच्या डोळ्यात धुळफेक करत हा प्रकार वर्षभरापासून सुरू होता. अरेबियन ज्वेलर्सचे महेबुब रहेमान मलिक हे खोटे अमिष दाखवून नागरिकांना विविध योजनेत पैसे गुंतवण्यास प्रवृत्त करत होते. या प्रकरणी स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक प्रा. सचिन उबाळे यांनी आवाज उठवत नागरिकांना अरेबियन ज्वेलर्सपासून सावध राहण्याचे आवाहन केले. एवढेच नाही तर २३ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या सर्व प्रकाराची माहिती दिली होती. मात्र पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले. केवळ पोलिसाच्या हलगर्जीपणामुळे अरेबियन ज्वेलर्स चालक बीडकरांना मोठ्या प्रमाणात गंडवून फरार झाला असल्याचा आरोप प्रा. सचिन उबाळे यांनी केला आहे.

## गोरगरिबांच्या हक्काचे घर साकार करण्यासाठी आमदार राजेश पवारांचे ऐतिहासिक अभियान

### जिल्ह्यातील एकमेव आमदार घरकुल नोंदणीसाठी स्वखर्चाने काम करून बक्षीस देणारे

धर्माबाद/अशोक पडोळे
दै.समर्थ राजयोग




नायगाव विधानसभा मतदार आमदार राजेश पवार यांनी नायगाव उमरी धर्माबाद तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला हक्काचे घर साकार करण्यासाठी ऐतिहासिक अभियान राबवून मतदारसंघांमध्ये सर्वसामान्य जनतेमध्ये एक प्रकारचे मनामध्ये प्रेम जोपासत आपले काम करत आहेत.

नायगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्वसामान्य गोरगरीब लोकांना आपल्या हक्काचे घर मिळावे म्हणून आमदार राजेश पवार यांनी आपल्या मतदारसंघातील ग्रामसेवक बंधू भगिनीस स्वखर्चातून ज्या ग्रामसेवकांनी सर्वाधिक जास्त घरकुल नोंदणी करणाऱ्या ग्रामसेवक यांना स्वखर्च्यातून होंडा युनिकॉर्न देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे.



तालुक्यातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक घरकुल नोंदणी करणाऱ्या ग्रामसेवक बंधू-भगिनी गॅलेक्सी ए नाईन देऊन सन्मानित करण्याचा निर्णय व मतदारसंघातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक घरकुल नोंदणी करणाऱ्या ग्रामसेवक बंधू भगिनीस स्मार्ट मोबाइल फोन देऊन सन्मानित करण्याचा निर्णय नायगाव उमरी धर्माबाद मतदारसंघाचे आमदार राजेश पवार यांनी घेतला आहे.

**राजेश पवार यांच्या प्रोत्साहन योजनेला जबरदस्त प्रतिसाद**

**आमदार राजेश पवार आणि त्यांच्या पत्नी सौभाग्यवती भाजपा महिला मोर्चा नांदेड जिल्हाध्यक्ष, माजी जिल्हा परिषद सदस्य पुनम ताई पवार यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेमुळे नायगाव मतदारसंघात अवघ्या आठ दिवसात 12000 बेघर कुटुंबाची घरकुलाची नोंदणी पूर्ण केली आहे.**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एन. ए. रणदिवे यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४९१/२०२५**
**इंदुमती बाबुराव लाखे व ईतर वि निरंक**
**(मार्फत-ॲड. एस. एल. मेमारे गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे बाबुराव पि. दगडू लाखे रा. एरंडगाव गेवराई ता. गेवराई जि. बीड हे / ह्या दिनांक २५/०८/२०१५ रोजी मौजे एरंडगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ इंदुमती भ्र. बाबुराव लाखे वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. एरंडगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ दादाभाऊ पि. बाबुराव लाखे वय वर्षे, धंदा - शेती रा. एरंडगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ३ विलास पि. बाबुराव लाखे वय - ४५ वर्षे, धंदा-शेती रा. एरंडगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ४ महादेव पि. बाबुराव लाखे वय - ४३ वर्षे, धंदा शेती रा. एरंडगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ५ वर्षाराणी भ्र. दादाभाऊ कदम वय ३८ वर्षे, धंदा शेती रा. पाटेगाव ता. जि. बीड, अर्जदार क. ६ मनीषा भ्र. शिवराम मते वय ३६ वर्षे, धंदा - शेती रा. शहजानपुर (लोणी) ता. जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बाबुराव पि. दगडू लाख रा. एरंडगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५/०५/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १८/०६/२०२५

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-**<br>**कनिष्ठ लिपीक**<br>**दिवाणी न्यायालय,**<br>**क.स्तर, गेवराई** | **आदेशावरून**<br>**स्वाक्षरित/-**<br>**सहाय्यक अधीक्षक**<br>**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई** |


महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री
मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब
यांचे प्रभावती नगरीत
सहर्ष स्वागत
स्वागतेच्छुक : शिवाजी शेषराव भरोसे
जिल्हाध्यक्ष,भाजपा परभणी महानगर